दाखल दिनांक — २०/०५/२०१०
नोंदणी दिनांक — २०/०५/२०१०
निर्णय दिनांक — २०/०५/२०१०
कालावधी : वर्षे, महिने दिवस.
००  ००  ०१

**दौंड येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (लोहमार्ग) न्यायालय, दौंड**
**(पिठासीन न्यायाधीश श्री. वाय.एच. शेख)**

**सं.फौ.ख.क्र. १३०७/२०१०** **निशाणी क्र ७**

रेल्वे सुरक्षा बल, कुर्डुवाडी } फिर्यादी.

विरुध्द

बबलु बबन घोरपडे } आरोपी
वय २४ वर्षे, रा. कुर्डुवाडी,
ता. माढा, जि. सोलापूर.

---

फिर्यादी पक्षातर्फे सहा.सरकारी श्री. वकील गैरहजर
आरोपीतर्फे वकील श्री.एस.टी.येरोळ

---

**न्यायनिर्णय**
**(पारीत दिनांक २०/०५/२०१०)**

आरोपीवर कलम १४४ (१) रेल्वे अधिनियम १९८९ अन्वये आरोप ठेवण्यात आलेला आहे.

२) फिर्यादी पक्षाची संक्षिप्त हकिकत येणेप्रमाणे —
दिनांक २०/०५/२०१० रोजी सकाळी ०७.०० वाजता आरोपी हा गाडी क्र. १०२७ डाउनच्या वेळी कुर्डुवाडी रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्र. २ वर प्रवाशांना विनापरवाना चहा विकत असतांना फिर्यादी श्री. संतोष सुखदेव पवार यांना मिळून आला.

३) अपराधाचे विवरण (नि.क्र.३) आरोपीस वाचून दाखविले असता त्याने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व न्याय चौकशी करण्याची मागणी केली.

४) माझ्यासमक्ष खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले व त्यावर मी पुढीलप्रमाणे कारणासहित निष्कर्ष देत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. आरोपी हा गाडी क्र. १०२७ डाउनच्या वेळी कुर्डुवाडी रेल्वे स्थानकावर विनापरवाना चहा विकत असतांना मिळून आल्याचे | |

फिर्यादी पक्षाने सिध्द केले आहे का ? ... होय.

२. आदेश ... अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारणमिमांसा

मुद्दा क्रमांक १ :—

५) श्री. संतोष सुखदेव पवार (फि.सा. क्र.१) यांचे साक्षीमध्ये आले आहे की, दिनांक २०/०५/२०१० रोजी त्याची कुर्डुवाडी रेल्वे स्थानकावर असतांना सदर दिवशी सकाळी ०७.०० वाजता गाडी क्रमांक १०२७ डाउनच्या वेळी आरोपी हा कुर्डुवाडी रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्र. २ वर प्रवाशांना विनापरवाना चहा विकत असतांना मिळून आला. त्यानंतर फिर्यादीने सदर आरोपीस परवान्याबाबत विचारले असता त्याने परवाना नसल्याचे सांगितले. त्यानंतर फिर्यादीने आरोपीस उप निरिक्षक श्री. एस.एन.कांबळे यांच्या हवाली केले आणि फिर्याद निशाणी क्र. ५ आरोपीविरुद्ध दिली. आरोपीने, तो विनापरवाना चहा विकत असल्याचे नाकारले आहे. परंतु उपरोक्त वेळी आरोपीने त्याची रेल्वे स्थानकावरील उपस्थिती तसेच त्याच्या ताब्यातील चहाचे प्रमाण नाकारलेले नाही. तसेच फिर्याद निशाणी क्र. ५ ही सदर साक्षीदाराने सिद्ध केलेली आहे. फक्त साक्षीदाराच्या उलटतपासामध्ये चहा विकत होता ही बाब नाकारणे, तो चहा विकत नव्हता हे गृहीत धरण्यास पुरेसे नाही. याव्यतिरिक्त फिर्यादीस आरोपीला खोटया प्रकरणात अडकविण्याचे कोणतेही कारण आरोपीने अभिलेखावर आणलेले नाही. सबब आरोपीची रेल्वे स्थानकावरील उपस्थिती आणि त्याच्या ताब्यात असलेल्या चहाचे प्रमाण लक्षात घेता तो उपरोक्त वेळी कुर्डुवाडी रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्र. २ वर गाडी क्र. १०२७ डाउनच्या वेळी विनापरवाना चहा विकत होता हेच सिद्व होते. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत असून आरोपीस रेल्वे अधिनियम १४४ (१) खाली दोषी ठरवित आहे .

६) आरोपीस शिक्षेबाबत विचारले असता त्याने सांगितले की, तो गरीब असून त्याचेवर पूर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे. तसेच ती कुटुंबातील एकटाच कमावता पुरुष आहे. प्रस्तुतचा गुन्हा आणि आरोपीच्या कौटुंबिक परिस्थितीचा विचार करता माझ्या मते आरोपीस दया दाखविणे योग्य वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी बबलु बबन घोरपडे यास कलम २५५ (२) फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये कलम १४४(१) रेल्वे अधिनियम १९८९ या अपराधाखाली सिद्ध दोषी ठरविण्यात येत असून त्याने सदर अपराधांसाठी रुपये १००/— (एकूण शंभर रुपये) दंड भरावा अन्यथा एक दिवसाची साध्या कैदेची शिक्षा भोगावी.

(वाय.एच.शेख)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
लोहमार्ग न्यायालय,दौंड

कुर्डुवाडी कॅम्प
दिनांक :— २०/०५/२०१०